

नेक्स्ट जेन जीएसटी रिफॉर्म' मध्यमवर्गीय आणि सामान्य जनतेसाठी एक मोठी भेट

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in  रविवार दिनांक 21/09/२०२५  METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 221|| RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# कायदा व सुव्यवस्थेच्या अंमलबजावणीने देशाची महासत्तेकडे वाटचाल - मुख्यमंत्री

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई – कायदा व सुव्यवस्थेच्या प्रभावी अंमलबजावणीने देश महासत्तेकडे वाटचाल करू शकतो. कायदा व सुव्यवस्थेचे पालन करताना अमली पदार्थ संदर्भातील गुन्हे हे पोलीस दलासमोर आव्हान ठरत असून यासाठी झीरो टॉलरन्स धोरण राज्याने अवलंबले आहे.

तसेच बदलत्या काळानुसार सायबर क्षेत्रातील गुन्ह्याची उकल करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.इंडियन पोलीस फाऊंडेशनच्या १० व्या स्थापना दिनानिमित्त “भारताच्या आर्थिक विकासासाठी पोलीस दलाची पुनर्कल्पना” या विषयावर चर्चा सत्राचे पोलीस मुख्यालय, कुलाबा येथे आयोजन करण्यात




आले होते.यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. कार्यक्रमास उत्तर प्रदेशचे सामाजिक न्याय राज्यमंत्री असीम अरूण, इंडियन पोलीस फाउंडेशनचे प्रमुख तथा मेघालयचे माजी राज्यपाल आर.एस. मुशहारी, फाउंडेशनचे अध्यक्ष उत्तर प्रदेशचे माजी पोलीस महासंचालक ओ.पी.सिंह, राज्याचे पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती यांच्यासह विविध राज्यातील पोलीस अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले,पोलीस दल तसेच समाजातही एकात्मता असणे आवश्यक आहे. यामुळे समाजातील नकारात्मकता कमी होते आणि राज्य व देश शाश्वत प्रगतीकडे वाटचाल करू शकतो. काळानुरूप गुन्ह्यांचे स्वरूप बदलले असून, जुन्या काळातील शाश्वत मुल्यांसह नव तंत्रज्ञानाचा वापर केल्यास प्रगती शक्य आहे. त्यानुसार २०२३ मध्ये नवीन पोलीस संघटनात्मक रचना तयार केली आहे.

गुन्ह्यांची जलद उकल करण्यास मदत व्हावी यासाठी अत्याधुनिक सायबर सिक्युरिटी लॅब उभारण्यात आली आहे. इतर देशांनीही आपल्या राज्यासारखी लॅब बनविण्याची मागणी केली आहे.

एआयच्या सहायाने गुंतागुंतीचे गुन्हे प्रकरणे अधिक वेगाने सोडविण्यात मदत होत आहे. देश आणि राज्याची तिन्ही दल सक्षम असल्याने अमली पदार्थांच्या माध्यमातून गुन्हेगारी वाढविणे आणि तरूणांना निष्क्रीय करण्यात येत आहे.

आज अमली पदार्थांची गुन्हेगारी पोलीस दलासमोर एक आव्हान आहे. यामध्ये झीरो टोलरन्स असणे महत्वाचे असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

# "तक्रारी मंत्रालय व संबंधित खात्यांपर्यंत पोहोचवू" - अजित पवार

## अजितदादांच्या नेतृत्वाखालील दुसऱ्या जनसंवादात ४,८०० तक्रारींची नोंद

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने पिंपरी येथे आज जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हडपसरमधील यशस्वी जनसंवादानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली पिंपरीत दुसऱ्या जनसंवादाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.हडपसरप्रमाणेच पिंपरी येथील जनसंवादातही नागरिक, विविध शासकीय विभाग आणि लोकप्रतिनिधी एकत्र आले. या उपक्रमासाठी डिजिटल हेल्पलाईन, व्हॉट्सॲप चॅटबॉट्स, डिजिटल किऑस्कसारखे आधुनिक तंत्रज्ञान वापरात आणले गेले, ज्यामुळे पारदर्शकता आणि उत्तरदायित्व



निश्चित झाले.आजच्या कार्यक्रमात २५ पेक्षा जास्त शासकीय विभागांनी सहभाग घेतला. एकूण ४,८०० तक्रारींची नोंद झाली असून त्यापैकी सुमारे १,८०० तक्रारींचे तत्काळ निराकरण करण्यात आले. बहुतांश तक्रारी पाणीपुरवठा, स्वच्छता आणि वाहतूक यांच्याशी संबंधित होत्या. अजितदादा पवार यांनी स्वतः संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवत तक्रार निवारणासाठी संबंधित विभागांना तात्काळ मार्गदर्शन केले.अजित पवार म्हणाले, "आज पिंपरीकरांनी मांडलेल्या प्रत्येक तक्रारी काळजीपूर्वक ऐकल्या. स्थानिक प्रशासनाच्या उपस्थितीत अनेक अडचणी त्वरित सोडवल्या. उर्वरित तक्रारी मंत्रालय, संबंधित मंत्रालये व विभागांपर्यंत पोहोचवण्यात येतील. प्रत्येक प्रकरणाचा फॉलो-अप करून त्याचे समाधान मिळेल याची खात्री आम्ही करून घेणार आहोत."जनसंवाद हा आता अजित पवारांचा नागरिकांशी संवाद साधण्याचा एक सुसंघटित पॅटर्न बनत आहे.

वैयक्तिक संवाद आणि डिजिटल साधने यांचा संगम घडवून आणणारा हा उपक्रम लोक आणि त्यांच्या प्रतिनिधींमधील विश्वास अधिक दृढ करत असून समस्यांचे पारदर्शक व जबाबदारीपूर्वक निराकरण यामुळे होत आहे.पिंपरीनंतर लवकरच राज्यातील इतर भागांतही हा जनसंवाद सुरू राहणार असून लोकांचे नागरी सेवेशी निगडित प्रश्न मार्गी लावण्यासाठी आणि सुलभ शासन देण्यासाठी हा सातत्यपूर्ण उपक्रम राबवला जाणार आहे.

# नाट्य महोत्सवातून उदयोन्मुख कलावंतांना संधी - अजित पवार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : उदयन्मुख कलाकारांना आपली कला सादर करण्यासाठी नाट्यमहोत्सवातून संधी मिळाली आहे. पिंपरी चिंचवड शहराची आता सांस्कृतिक ओळखही निर्माण झाली असून अनेक कवी, लेखक, साहित्यिक, अभिनेते घडले आणि घडत राहतील. यामुळे शहराचा नावलौकिक वाढवला आहे. सरकार म्हणून सांस्कृतिक, कला, साहित्य क्षेत्राला शक्यतो सर्व मदत करण्याचा आमचा प्रयत्न आहे. पिंपरी चिंचवड महापालिका प्रशासनाने या महोत्सवाला मदत करून कला, संस्कृती जोपासण्यास हातभार लावला आहे, असे मत उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केले.पिंपरी चिंचवड महानगरपालिका, थिएटर वर्कशॉप कंपनी व पैस कल्चरल फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "रंगानुभूति: पूर्वरंग ते उत्तररंग नाट्य प्रयोग कला महोत्सव २०२५" औपचारिक उद्घाटन अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त आणि महोत्सवाचे निमंत्रक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, उपायुक्त पंकज पाटील, तृप्ती सांडभोर, राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य ॲड. गोरक्ष लोखंडे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्राचे प्रमुख प्रवीण भोळे, पैस रंगमंचचे संस्थापक प्रभाकर पवार, समन्वयक अमृता ओंबळे आदी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने २०१३ मध्ये कला क्रीडा धोरण निश्चित केले असून स्थानिक कलाकारांना नेहमीच प्रोत्साहन दिले जाते. शहरातील विविध शाळांमध्ये संगीत, कला, नाट्य प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात येतात. या माध्यमातून शहराच्या सांस्कृतिक वैभवात वाढ होत आहे.

रंगानुभूती नाट्य महोत्सवात महाराष्ट्रसह राजस्थान, केरळ, पश्चिम बंगाल, कर्नाटक आदी राज्यांतील कलावंत सहभागी झाले असून त्यांची कला पाहण्याची संधी पिंपरी चिंचवडकरांना उपलब्ध झाली आहे. दरवर्षी अशाप्रकारचा महोत्सव आयोजित केला जाईल, असे शेखर सिंह यांनी सांगितले.

यावेळी पिंपरी चिंचवड परिसरातील नाट्य, सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यरत, दिशा सोशल फाऊंडेशन, टेल्को कलासागर, अखिल भारतीय नाट्य परिषदे पिंपरी चिंचवड शाखा, अथर्व थिएटर, कलापिनी तळेगाव दाभाडे, नाटक घर, द बॉक्स, आसक्त, महाराष्ट्र कल्चरल सेंटर सुदर्शन रंगमंच, संस्कार भारती या संस्थेचा प्रयोग कला सन्मान देऊन गौरविण्यात आले.सूत्रसंचालन मिलिंद बावा, तेजस्विनी गांधी कुलकर्णी यांनी केले. अमृता ओंबळे यांनी आभार मानले.

# "स्मार्ट सुनबाई" येत्या 21 नोव्हेंबर ला संपूर्ण महाराष्ट्रात होणार प्रदर्शित

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




नाविन्यपूर्ण संकल्पना आणि उत्सुकतेने सजलेला एक धमाल मराठी चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. शिवाजी दोलताडे दिग्दर्शित आणि गोवर्धन दोलताडे, गार्गी निर्मित, कार्तिक दोलताडे पाटील सह निर्मित हास्य, थरार आणि गूढतेने भरलेला एक नवाकोरा सिनेमा “स्मार्ट सुनबाई” २१ नोव्हेंबर २०२५ ला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. नुकतेच या सिनेमाचे जबरदस्त पोस्टर प्रदर्शित झाले आहे.

या चित्रपटाच्या पोस्टरने प्रेक्षकांच्या मनात औत्सुक्याची ठिणगी पेटवली आहे. पोस्टरवरूनच हे स्पष्ट होते की या कथेत काहीतरी विलक्षण आणि गूढ दडलेले आहे. चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे.

तर पोस्टर वरील काही कलाकार शहरी लुक मध्ये तर काही कलाकार ग्रामीण लुक मध्ये दिसत आहेत. याच वैविध्यामुळे प्रेक्षकांच्या मनात एकच प्रश्न निर्माण झाला आहे.

“ही स्मार्ट सुनबाई नक्की कोण?आणि तिच्या आयुष्यात असं काय घडणार आहे?” रोहन पाटील, संतोष जुवेकर, भाऊ कदम, मोहन जोशी, दीपक शिर्के, अंशुमन विचारे, विनम्र बाबल, सायली देवधर, प्राजक्ता गायकवाड, प्राजक्ता हनमगर, स्नेहल शिदम, किशोरी शहाणे, उषा नाईक, भक्ती चव्हाण, दीप्ती सोनवणे, अनुष्का बेनके, पूजा राजपूत, सुचिका जोशी, विद्या मेहेत्रे, आर्या सकुंडे, वैशाली चौधरी, सपना पवार , कांचन चौधरी यांसारखे दिग्गज आणि लोकप्रिय कलाकार या सिनेमात झळकणार असून, त्यांची केमिस्ट्रीच या चित्रपटाची खरी जमेची बाजू ठरणार आहे , प्रत्येक सुनेला "स्मार्ट सुनबाई" होण्या साठी हा चित्रपट नक्कीचं प्रेरणादायी ठरेल अस दिग्दर्शक शिवाजी दोलताडे यांनी सांगितले.

चित्रपटाची कथा आणि लेखन योगेश शिरसाट यांनी केले असून, विजय नारायण गवंडे,साई - पियुष यांनी या सिनेमाला बहारदार संगीताची साथ दिली आहे. गीतकार वैभव देशमुख, अदिती द्रविड असून अजय गोगावले, वैशाली माढे, आनंदी जोशी, सावनी रवींद्र, उर्मिला धनगर यांचे सुरेल स्वर या सिनेमाला लाभले आहेत.प्रेक्षकांच्या मनात उत्सुकतेची लाट निर्माण करणारा हा नवीन सिनेमा लवकरच मोठ्या पडद्यावर उलगडणार आहे. शिवाजी दोलताडे दिग्दर्शित आणि गोवर्धन दोलताडे, गार्गी निर्मित चित्रपट ”स्मार्ट सुनबाई” २१ नोव्हेंबरपासून संपूर्ण महाराष्ट्रात प्रेक्षकांच्या भेटीला येतोय.

# महापालिकेच्या भोसरी येथील इंद्रायणीनगर शाळेत आरोग्य तपासणी शिबीर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी - आज पिंपरी -चिंचवड महानगरपालिकेच्या इंद्रायणीनगर प्राथमिक शाळा, भोसरी येथे प्राथमिक आरोग्य तपासणी कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. या कार्यक्रमांतर्गत इयत्ता पहिली ते सातवी मधील ५५८ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.विद्यार्थ्यांची कुष्ठरोग तपासणी वाय सी एम. हॉस्पिटल, पिंपरी यांच्या तज्ज्ञांनी तपासणी केली.



तसेच, औंध जिल्हा रुग्णालयाच्या डॉक्टरांच्या उपस्थितीत संपूर्ण आरोग्य तपासणी करण्यात आली, ज्यामध्ये शालेय मुलांच्या दृष्टी, दात, त्वचा आणि सामान्य शारीरिक आरोग्याची पाहणी केली गेली.सर्व मुलांचा अहवाल निरोगी व आरोग्यदायी आला असून, कुठल्याही गंभीर आजाराची नोंद नाही असे डॉक्टरांच्या अहवालात दिसून आलेमहानगरपालिका शिक्षण विभाग दरवर्षी शाळांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी व विद्यार्थ्यांच्या आरोग्याची तपासणी करण्यासाठी आरोग्य तपासणी शिबीर आयोजित केले जाते. विद्यार्थ्यांचे आरोग्य वेळेवर तपासणे हे त्यांच्या शारीरिक व शैक्षणिक विकासासाठी अत्यंत आवश्यक आहे.महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी पालकांना आवाहन केले आहे की, आपल्या मुलांना शाळेत नियमित पाठवून या आरोग्य तपासणीत सहभागी करावे, जेणेकरून त्यांचे आरोग्य वेळेवर लक्षात येईल आणि आवश्यक उपचार वेळेत करता येतील.कोट-शाळेतील मुलांचे आरोग्य तपासणे हे केवळ आजची काळजी नाही, तर त्यांच्या उज्वल भविष्यासाठी केलेली महत्त्वाची तयारी आहे. पालकांनी आपल्या मुलांना शाळेत नियमित पाठवून या आरोग्य तपासणीत सहभागी करावे, जेणेकरून लहान लक्षणांनाही वेळेत ओळखता येईल आणि आवश्यक उपचार वेळेवर करता येतील.

मुलांचे शारीरिक तसेच मानसिक विकास सुनिश्चित करणे हे आपले सामूहिक कर्तव्य आहे.– प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिकाविद्यार्थ्यांच्या आरोग्यावर लक्ष ठेवणे म्हणजे त्यांच्या संपूर्ण शारीरिक आणि शैक्षणिक विकासाची काळजी घेणे.

यासाठी शाळा आणि पालकांनी मिळून सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. आरोग्य तपासणी शिबीरातून मुलांचे आरोग्य वेळेवर तपासले जाऊन त्यांचे पोषण, दृष्टी, दात, त्वचा व इतर शारीरिक स्वास्थ्य सुनिश्चित होते.

अशा कार्यक्रमांमुळे मुलांना निरोगी जीवनशैली शिकता येते .- किरणकुमार मोरे, सहायक आयुक्त, शिक्षण विभाग, पिंपरी चिंचवड महापालिका

# वृद्ध महिला प्रवाशांना लुटणारी टोळी जेरबंद

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी- चिंचवड: वृद्ध प्रवाशी महिलांना चाकूचा धाक दाखवून लुटणाऱ्या तिघांना गुन्हे शाखा युनिट चार ने अटक केली आहे. आरोपींकडून जवळपास तेरा तोळे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहे. ही घटना भुजबळ चौक वाकड बस स्थानक जवळ घडली होती.




आबासाहेब अंकुश मदने, कैलास पांडुरंग टोंपे आणि वैभव जनार्दन सुर्यतळ अशी अटक करण्यात आरोपींची नाव आहेत.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन वृद्ध महिला खोपोलीला जाण्यासाठी भुजबळ चौकातून आरोपींच्या गाडीत बसल्या. आरोपींची गाडी खासगी आहे, हे त्यांना माहीत नव्हतं. काही अंतरावर गेल्यानंतर दोन्ही प्रवाशी महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने बघितल्यानंतर आरोपींनी काही अंतरावरून गाडी कात्रजच्या दिशेला वळवली.कात्रजच्या बोगद्यात नेऊन महिलांना धमकावत चाकूचा धाक दाखवून लुटलं. या प्रकरणी महिलांनी पोलिसांमध्ये तक्रार दिली होती. गुन्हे शाखा युनिट चार चे पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू केला.ज्या गाडीतून महिलांना घेऊन जाण्यात आलं त्या गाडीचा शोध सुरू केला. अनेक ठिकाणचे सीसीटीव्ही तपासले.

अखेर पोलीस आरोपींपर्यंत पोहचले. त्यांना याप्रकरणी अटक करण्यात आली आहे. आरोपींकडून तेरा तोळे सोन्याचे दागिने जप्त केले आहेत. ही कारवाई गुन्हे पोलीस उपायुक्त शिवाजी पवार, सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांच्या टीमने केली आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

रविवार दिनांक 21/09/२०25

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# नेक्स्ट जेन जीएसटी रिफॉर्म' मध्यमवर्गीय आणि सामान्य जनतेसाठी एक मोठी भेट

## भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटेंची माहिती



>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी-चिंचवड: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या जनहितकारी योजना आणि भाजपच्या राष्ट्रव्यापी अभियानांची माहिती देण्यासाठी पिंपरी-चिंचवड शहर (जिल्हा) भाजपने पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यामध्ये भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी 'सेवा पंधरवडा', 'आत्मनिर्भर भारत संकल्प अभियान' आणि नुकत्याच जाहीर झालेल्या जीएसटी दरांमधील कपातीबद्दल सविस्तर माहिती दिली. पिंपरी येथील हॉटेल घरोंदा, मोरवाडी येथे पत्रकार परिषद पार पडली.या पत्रकार परिषदेला भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांच्यासह आमदार महेश लांडगे, आमदार अमित गोरखे, युवा मोर्चा प्रदेश अध्यक्ष अनुप मोरे, सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, विकास डोळस, प्रदेश सदस्य राजेश पिल्ले, महिला मोर्चा अध्यक्ष सुजाता पालांडे, माजी उपमहापौर तुषार हिंगे, जीएसटी रिफॉर्म अभियान संयोजक मधुकर बच्चे, सहसंयोजक बबनराव डांगले, आत्मनिर्भर भारत संकल्प अभियानाचे संयोजक राजू दुर्गे, व्यापारी आघाडीचे राजेंद्र चिंचवडे, कैलास कुटे आदी पदाधिकारी उपस्थित होते. जीएसटी रिफॉर्म अभियान संयोजक मधुकर बच्चे, सहसंयोजक बबनराव डांगले, आत्मनिर्भर भारत संकल्प अभियानाचे संयोजक राजू दुर्गे यांनी अभियानाविषयी माहिती दिली व सेवा पंधरवडा अभियानाच्या संयोजिका वैशाली खाडये यांनी झालेल्या कार्यक्रमांची माहिती दिली.यावेळी बोलताना शत्रुघ्न काटे यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत 'सेवा पंधरवडा' अभियान राबवले जात आहे. पिंपरी-चिंचवड शहरात या अभियानांतर्गत विविध सेवाभावी उपक्रम घेण्यात आले. यामध्ये ५० हून अधिक आरोग्य तपासणी आणि रक्तदान शिबिरे तसेच स्वच्छता अभियानांचा समावेश होता. या शिबिरांमध्ये हजारो नागरिकांनी सक्रिय सहभाग घेतला. विशेषतः, रक्तदान शिबिरांमध्ये तरुणांचा सहभाग लक्षणीय होता, ज्यामुळे हे अभियान यशस्वी झाले, असे काटे यांनी नमूद केले.काटे यांनी 'आत्मनिर्भर भारत' आणि 'जीएसटी रिफॉर्म' अभियानाचे महत्त्वही विशद केले. ते म्हणाले की, पंतप्रधान मोदींच्या दूरदृष्टीमुळे 'आत्मनिर्भर भारत' हे केवळ एक अभियान न राहता, आता ते एक जनआंदोलन बनले आहे. या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन देणे, लघु आणि मध्यम उद्योगांना (MSME) आर्थिक मदत देणे आणि 'मेक इन इंडिया'ला गती देणे आहे.यासोबतच, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी नुकत्याच जाहीर केलेल्या जीएसटी दरांमधील कपातीचे काटे यांनी स्वागत केले. त्यांनी म्हटले की, हा 'नेक्स्ट जेन जीएसटी रिफॉर्म' मध्यमवर्गीय आणि सामान्य जनतेसाठी एक मोठी भेट आहे. या ऐतिहासिक दर कपातीमुळे सूक्ष्म, मध्यम आणि लघु उद्योगांना विशेष प्रोत्साहन मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच, जीएसटी प्रणालीमुळे करसंकलनात वाढ झाली असून, त्यातून मिळालेल्या उत्पन्नाचा उपयोग पायाभूत सुविधा आणि विकास कामांसाठी केला जात आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त 17 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर 2025 या काळात देशभरात सेवा पंधरवडा साजरा केला जात आहे. या पंधरवड्यात अनेक समाजोपयोगी कार्यक्रम घेण्यात येत आहेत. यामध्ये रक्तदान शिबिरे, स्वच्छता अभियान आणि आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करून लोकांची सेवा केली जात आहे. याचबरोबर, राज्यातील खास व्यक्तींचा आणि दिव्यांग व्यक्तींचा सन्मान करून त्यांना आवश्यक उपकरणे वाटप केली जाणार आहेत. पर्यावरणाची काळजी घेण्यासाठी 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमाअंतर्गत वृक्षारोपण केले जाणार आहे. लोकांना पंतप्रधान मोदींच्या जीवनाबद्दल आणि त्यांच्या कार्याबद्दल अधिक माहिती मिळावी, म्हणून त्यांच्या जीवनावर आधारित प्रदर्शनी आणि पुस्तकांचे वाटपही करण्यात येईल. 'विकसित भारत', 'आत्मनिर्भर भारत', 'स्वदेशी' आणि 'व्होकल फॉर लोकल' यांसारख्या महत्त्वाच्या संकल्पनांचा प्रसार करणे, हा या कार्यक्रमाचा एक मुख्य उद्देश आहे. याशिवाय, पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जीवन कार्याची माहिती दिली जात आहे आणि 'मोदी विकास मॅरेथॉन' सारख्या स्पर्धांचे आयोजन केले जात आहे.यासोबतच, देशभरात आत्मनिर्भर भारत हा 90 दिवसांचा एक मोठा कार्यक्रम सुरू आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश भारताला सर्व बाबतीत स्वयंपूर्ण बनवणे हा आहे. या कार्यक्रमाअंतर्गत सर्व जिल्ह्यांमध्ये आणि मंडळांमध्ये स्थानिक मेळावे, शिबिरे आणि संमेलनांचे आयोजन केले जात आहे. तसेच, स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी खादीच्या वस्तू खरेदी करण्यास आणि लोकांना त्या वापरण्यासाठी प्रोत्साहित केले जात आहे. राज्य सरकार आणि महानगरपालिकांच्या माध्यमातून या अभियानाचा व्यापक प्रचार केला जात आहे. हे दोन्ही कार्यक्रम देशाच्या विकासासाठी आणि जनतेच्या कल्याणासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत.शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी मोदी सरकारच्या प्रमुख कल्याणकारी योजनांचीही माहिती दिली.

'आयुष्मान भारत' योजनेमुळे लाखो गरीब कुटुंबांना मोफत वैद्यकीय उपचार मिळाले आहेत, तर 'पंतप्रधान किसान सन्मान निधी'ने शेतकऱ्यांच्या खात्यात थेट पैसे जमा केल्याने त्यांना मोठा आधार मिळाला आहे. त्याचप्रमाणे, 'जन धन' योजनेने कोट्यवधी लोकांना बँकिंग व्यवस्थेशी जोडून आर्थिक समावेशनाला चालना दिली आहे, असेही त्यांनी सांगितले. सरचिटणीस मोरेश्वर शेडगे यांनी प्रास्तावना केली. सूत्रसंचालन शहर प्रवक्ते कुणाल लांडगे यांनी केले. आभार सरचिटणीस विकास डोळस यांनी मांडले.

# मावळातील चार ग्रामपंचायतींना नवीन कार्यालयांसाठी ८५ लाखांचा निधी

## आमदार सुनील शेळके यांच्या पाठपुराव्याला यश




>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वडगाव मावळ, १९ सप्टेंबर – मावळ तालुक्यातील ग्रामीण भागातील प्रशासनिक सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेअंतर्गत तालुक्यातील चार ग्रामपंचायतींना नवीन कार्यालय बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता मिळाली असून, एकूण ₹८५ लाखांचा निधी मंजूर झाला आहे.या योजनेतून टाकवे खुर्द ग्रामपंचायत – ₹२० तर कुसगाव बु. ग्रामपंचायत – ₹२५ लाख , सांगिसे ग्रामपंचायत – ₹२० लाख , घोणशेत ग्रामपंचायत – ₹२० लाख एकूण ८५ लाख रुपयांच्या निधी मंजूर झाला आहे या मंजुरीमुळे ग्रामपंचायतींना आधुनिक, सुटसुटीत व नागरिकाभिमुख कार्यालयांची उभारणी करता येणार असून, ग्रामस्थांना अधिक सक्षम व दर्जेदार सेवा उपलब्ध होणार आहेत. या निर्णयामुळे ग्रामपंचायत कार्यकाळ प्रभावी होईल आणि प्रशासनिक कामकाज सुलभ होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

गेल्या काही महिन्यांपासून या निधीसाठी आमदार श्री. सुनील शंकरराव शेळके यांनी शासनदरबारी सातत्याने पाठपुरावा केला होता. अखेर त्यांच्या पुढाकाराला यश मिळाले असून, तालुक्यातील ग्रामपंचायतींना मोठा दिलासा मिळाला आहे.आमदार शेळके म्हणाले, "ग्रामपंचायत ही गावाच्या विकासाचे केंद्र आहे.

सशक्त पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्या की ग्रामविकासाला गती मिळते. या निधीमुळे ग्रामपंचायतींचे कामकाज अधिक प्रभावी होईल आणि नागरिकांना वेळेवर सेवा मिळेल.

"या निर्णयाचे ग्रामस्थ व स्थानिक जनप्रतिनिधींनी स्वागत केले असून, "आमदार सुनील शेळके हे खऱ्या अर्थाने विकासाभिमुख नेतृत्व आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे मावळ तालुक्यात अनेक विकासकामे होत आहेत" अशा शब्दांत समाधान व्यक्त केले.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968